दि.२५/०५/२०२३

**प्रसिध्दी पत्रक**

आरोपी लोकसेवक - श्री नितीन दशरथ मोरे, वय 47 वर्षे, पद- पो.उप.नि. (ग्रेड Psi), नेमणुक- पोलीस स्टेशन सिडको औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रुपये 12000/- रक्कम स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिडको औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री नितीन दशरथ मोरे, वय 47 वर्षे, पद- पो.उप.नि. (ग्रेड Psi), नेमणुक- पोलीस स्टेशन सिडको औरंगाबाद शहर. |
| लाच मागणी रक्कम | :- | प्रथम 20000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 12000/- रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रार अर्जावरुन गुन्हा दाखल न करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे विरुध्द पोलीस स्टेशन सिडको औरंगाबाद शहर येथे तक्रारी अर्ज दाखल असून सदर अर्ज चौकशीकामी आ.लो.से. श्री. मोरे यांचेकडे आहे. तक्रारी अर्जावरुन गुन्हा दाखल न करण्यासाठी व गुन्हा दाखल झाल्यास आरोपी न करण्यासाठी तक्रारदार यांना 20,000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 25/05/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. मोरे यांनी तडजोडीअंती 12000/- रुपये पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून साई रसवंती सिडको पो.स्टे. च्या मागे एन-7 सिडको येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे सिडको औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत वारे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो. अं. साईनाथ तोडकर, राजेंद्र सिनकर, विलास चव्हाण यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

25.05.25

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.